**मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित इंडक्शन फरनेस, रोलिंग मिल व सबमर्ज्ड आर्क फरनेसची उभारणी करून इनगॉट्स व बिलेट्स - ५,००,००० टन प्रतिवर्ष, टीएमटी व लाँग प्रॉडक्ट-५,००,००० टन प्रतिवर्ष व फेरो अलॉयज-२५००० टन प्रती वर्ष क्षमतेच्या संयंत्राच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **३०/०६/२०२१** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.३० वाजता** |
| **स्थळ** | : | **प्रकल्प स्थळ, मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी, घुग्घूस, चंद्रपूर.** |

**प्रस्तावनाः-**

मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित इंडक्शन फरनेस, रोलिंग मिल व सबमर्ज्ड आर्क फरनेसची उभारणी करून इनगॉट्स व बिलेट्स - ५,००,००० टन प्रतिवर्ष, टीएमटी व लाँग प्रॉडक्ट-५,००,००० टन प्रतिवर्ष व फेरो अलॉयज-२५००० टन प्रती वर्ष क्षमतेच्या संयंत्राच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. २७-२९ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. २०/०४/२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र कोराना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशान्वये टाळेबंदी व जमावबंदी लागु करण्यात आली होती. या कारणास्तव सदरहू जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व त्याबाबत दि. १९/०४/२०२१ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसारित करून संबंधितांना अवगत करण्यात आले होते. त्यानंतर म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. ३०/०६/२०२१ ही

तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, म.प्र.नि. मंडळाने दि. १९/०६/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडीया" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
८. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. नगर परिषद कार्यालय, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर.
१०. पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय, शेनगांव, ता. जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, उसगांव, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय, पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर.
१४. ग्रामपंचायत कार्यालय, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर.
१५. ग्रामपंचायत कार्यालय, नाकोडा, ता.जि. चंद्रपूर.
१६. ग्रामपंचायत कार्यालय, नायगांव, ता. जि. चंद्रपूर.
१७. ग्रामपंचायत कार्यालय, बेलसनी, ता.जि. चंद्रपूर.
१८. ग्रामपंचायत कार्यालय सिवनी, ता.जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ४ ते १९ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना

त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ मे. लॉयड मेटल्स अॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-४५/२०२१ दि. २५/०६/२०२१-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२१६०२५-FTS-०२२०, सहपत्र-१)

१) श्री. मनोहर गव्हाड,
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर - **अध्यक्ष,**

२) श्री अशोक मा. करे,
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर - **सदस्य**

३) श्री. अजित पाटील,
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर - **समन्वयक**

सदर प्रकल्पाची जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. उमाशंकर भादुले, प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या पध्दतीबद्दल माहीती दिली.त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जनसुनावणी समितीचे सदस्य श्री. उमाशंकर भादुले, प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी मे. लॉयड मेटल्स अॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१

व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित इंडक्शन फरनेस, रोलिंग मिल व सबमर्ज्ड आर्क फरनेसची उभारणी करून इनगॉट्स व बिलेट्स - ५,००,००० टन प्रतिवर्ष, टीएमटी व लाँग प्रॉडक्ट-५,००,००० टन प्रतिवर्ष व फेरो अलॉयज-२५००० टन प्रती वर्ष क्षमतेच्या संयंत्राच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्याकरिता मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येते. ही समिती फक्त लोकांचे या प्रकल्पाबाबत मत नोंदविण्यासाठी असून, समितीला कोणताही निर्णय घेण्याचा व शिफारस करण्याचा अधिकार नाही. जनसुनावणीत उपस्थित मुद्दयांना व त्यास प्रकल्प धारकांनी दिलेले उत्तर याबद्दल अहवाल तयार करुन पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना सादर करावयाचा असतो. व त्यावर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई पुढील निर्णय घेतात. सदर सुनावणीची छायाचित्रीकरण म.प्र.नि. मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील व त्यानंतर त्यांनी प्रकल्पधारक यांनी प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. मोहन रहांगदळे, पर्यावरण सल्लागार यांनी सदर नियोजीत प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण ,सारांश निष्कर्ष ,
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा.विस्थापन इत्यादी बाबतची माहीती,ध्वनी,जमिन,पाणी,
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा ,पाणी ,विस्थापन ,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.

➢ प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
➢ इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१) **श्री. ईबादुल सिद्दीकी, सामाजिक कार्यकर्ता, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर विस्तारीकरण प्रकल्पास माझा विरोध आहे. मागील कित्येक वर्षांपासून मे. लॉयड मेटल्स अॅण्ड एनर्जी लि. या परिसरात उद्योग चालवत आहे. परंतु त्यांनी या परिसरात किती जनहिताचे कार्य केले, पर्यावरण संवर्धनासाठी काय केले, तसेच स्थानिक नागरीकांच्या आरोग्यासंबंधी कोणती उपाय योजना केली जसे की किती आरोग्य शिबिरे घेतली व पर्यावरण संवर्धनाकरिता किती झाडे जगविली आहेत. कारण कंपनीने प्रदूषण कमी करण्यासंबंधी कोणती उपाय योजना केली. या क्षेत्रात मुल जन्माला येतानाच आजारी असतो कारण या क्षेत्रात प्रदूषणाचे प्रमाण जास्त आहे. स्पॉन्ज आयर्न उद्योगातून डस्ट निर्माण होऊन येथील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. संपूर्ण जगात रहिवाशी क्षेत्रालगत कोठेही स्पॉन्ज आयर्न उद्योग अस्तित्वात नाही. इतक्या वर्षांनंतरही येथील नागरीकांचा जीव वाचविण्याकरिता कंपनीने कोणतीही उपाय योजना केलेली नाही. CSR निधीचा वापर घुग्घूस क्षेत्रात कुठे व कसा करण्यात आला. कंपनीने CSR निधीबाबतची माहिती अशा प्रकारे तयार केली की त्यात त्रुटी काढणे अशक्य आहे. कंपनीने सर्वप्रथम आरोग्यास महत्त्व द्यावे अन्यथा विस्तारीकरणास माझा विरोध आहे व त्यानंतर रोजगारास महत्त्व द्यावे. परंतु कंपनीने स्थानिक नागरीकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. जर आरोग्य चांगले राहिले तरच स्थानिक नागरीकांना | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण जागेच्या ३३% जागा वृक्षारोपणाकरिता राखीव ठेऊन तेथे हरीत पट्टा निर्माण करावयाचा असतो. त्याप्रमाणे या प्रकल्पाच्या एकूण जागेपैकी ३३% जागेवर मागील १०-१५ वर्षात हरीतपट्टा निर्माण करण्यात आलेला आहे. एकूण २.० लक्ष झाडे मागील १५ वर्षात जगविण्यात आलेली आहेत व जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. प्रकल्पातील हरीत पट्टा ३३% वरून ५०% पर्यंत नेण्याचे कंपनीचे मानस आहे. त्यामध्ये फळझाडे, फलझाडे व परिसरात असलेल्या झाडांची लागवड करण्यात येईल. कंपनीने नियमाप्रमाणे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली आहे ती व्यवस्थितरीत्या काम करते. सन २०२० मध्ये पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने नविन |

| | | |
|---|---|---|
| | रोजगाराचा फायदा होईल. | अधिसूचना प्रकाशित केली व स अधिसूचनेनूसार कारखान्यातील प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत आवश्यक ते बदल करण्यात येईल. आरोग्य समस्येबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील व भविष्यात आरोग्याबाबत कोणतीही समस्या उपस्थित होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. |

**२) श्री. सय्यद अनवर, आमराई वार्ड, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी घुग्घूस शहरातील सर्वात प्रदूषित वॉर्डचा रहिवासी आहे. आज घुग्घूस शहराच्या वाढत्या प्रदूषणामुळे शहरातील लहान मुलांचा दम्याच्या आजारामुळे मृत्यू होत आहे. माझ्या मुलीला या प्रदूषणामुळे दम्याचा आजाराने ग्रासले असून मला माझ्या मुलीला शहरातील इतर ठिकाणी स्थलांतरीत करावे लागले आहे. या प्रस्तावित उद्योगास माझा विरोध आहे कारण सदर उद्योग घुग्घूस परिसरासाठी अभिशाप आहे. सदर जनसुनावणी नगर परिषद कार्यालय, घुग्घूस किंवा घुग्घूस शहरातील गांधी चौक या ठिकाणी आयोजित करायला हवी होती. सदर जनसुनावणीबाबत कालपर्यंत स्थानिक नागरीकांना कल्पना देखील कंपनीने दिलेली नव्हती. माझी जनसुनावणी समितीला विनंती आहे की, सदर जनसुनावणी परत घेण्यात यावी व स्थानिक नागरीकांचे लेखी निवेदन घेण्यात यावे. म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांच्या दि. ०२/०६/२०२० रोजीच्या पत्रानूसार सदर उद्योग घुग्घूस परिसरातील मानवी आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. सदर परिसरातील ऑक्सीजन हे मानवी आरोग्यासाठी अयोग्य असल्याचे वारंवार सिद्ध झालेले आहे. माझा या जनसुनावणीला विरोध आहे आणि जर या कंपनीला ना-हरकत प्रमाणपत्र दिले गेले तर त्या विरूद्ध तीव्र आंदोलन करण्यात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आरोग्य समस्येबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील व भविष्यात आरोग्याबाबत कोणतीही समस्या उपस्थित होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. |

३) **श्री. बृजभूषण पाझारे, जिल्हा परिषद सदस्य, नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारा जवळ आयोजित केल्याबाबत मी कंपनी प्रशासन व शासनाचा आभारी आहे. पूर्वी घुग्घूस क्षेत्रात कारखाने व मोठे उद्योग अस्तित्वात नव्हते. काही वर्षानंतर येथे उद्योग येण्यास सुरूवात झाली. मोठे उद्योग आल्यामुळे या परिसरातील नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. आज शासकीय नौकरी मिळणे कठीण झालेले आहे परंतु लॉयड मेटल्स या कंपनीने ७०० लोकांना नौकरीची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. पर्यावरण संवर्धनाकरिता कंपनीने एकूण रू. ७५ लक्षची तरतूद केलेली आहे. प्रदूषण नियंत्रणाकरिता अद्यावत यंत्रणा उभारली जाणार आहे. सदर उद्योगामुळे या परिसरात पिण्याचे शुद्ध पाणी, रस्ते व CSR निधीच्या माध्यमातून सोई सुविधा पूरविल्या जाणार आहे. सदर जनसुनावणीला माझा पाठींबा आहे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

४) **श्री. सुरज मल्हारी पाईकराव, जिल्हा महासचिव, बी.आर.एस.पी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्याकडे घुग्घूस शहराच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडून प्राप्त झालेला रोगनिहाय अहवाल आहे. यामध्ये दमा, त्वचा रोग, कुष्ठ रोग आणि डोळ्याच्या आजाराचा समावेश आहे. सन २०१५ मध्ये ४२७ लोकांना दम्याचा आजार झालेला होता. सन २०१६ मध्ये ४७९, सन २०१७ मध्ये ६०३, सन २०१८ मध्ये ५५७, सन २०१९ मध्ये ३९६ व सन २०२० मध्ये कोराना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे कमी रूग्णसंख्या निदर्शनास आली. सन २०१५ पासून त्वचेच्या रोगाचा प्रादुर्भाव हा वाढत्या प्रदूषणामुळे वाढलेला असल्याचे निदर्शनास येते. मी सन २०१९, २०२० व २०२१ मध्ये मे. एसीसी लि., मे. लॉयड मेटल्स व मे. वे.को.लि. यांना वेळोवेळी निवेदन दिलेले आहेत. सदर निवेदनात वीज व पाण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली | समन्वयक, पर्यावरण विषयक जनुसनावणी समिती यांनी सांगितले की, म.प्र.नि. मंडळाने नियमाप्रमाणे जनसुनावणीच्या ३० दिवसांच्या आधी दैनिक वृत्तपत्रांमध्ये जाहीरात प्रकाशित करून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) व प्रकाशित करण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी जाहिरातींची प्रत प्रकल्पालगतच्या सर्व ग्रामपंचायतींमध्ये नागरीकांना अभ्यासण्यासाठी ठेवण्यात आलेली होती.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, |

| | | |
|---|---|---|
| | होती. प्रदूषणामुळे माझ्या राहत्या घरी देखील धुळीचे साम्राज्य पसरलेले आहे. तसेच कंपनीमधील रासायनिक दुर्गंध हवेद्वारे संपूर्ण घुग्घूस शहरात पसरते. कंपनीने स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रकाशित केलेली नाही. माझा या जनसुनावणीला विरोध आहे. | आरोग्य समस्येबाबत प्राथमि आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील व भविष्यात आरोग्याबाबत कोणतीही समस्या उपस्थित होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कारखान्यातुन दुर्गंधी पसरत नाही. घरोघरी जाळण्यात येणाऱ्या कोळशामुळे शहरात दुर्गंधी पसरते. जो कोळसा जळत नाही अशा कोळशाचा दुर्गंध परिसरात पसरतो. कारखान्यामध्ये वेस्ट हीट रिकव्हरी बॉयलर यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्यामध्ये कार्बन मोनॉक्साईडचा कच्चा माल म्हणून वापर करण्यात येतो ज्यामुळे कोळशाची गर्मी कमी करण्यास मदत होते व परिसरात दुर्गंधी देखील पसरत नाही. कार्बन मोनॉक्साईड वेस्ट हीट रिकवरी बॉयलरमध्ये पूर्णपणे जळल्यानंतर ईएसपी यंत्रणेद्वारे वातावरणात सोडण्यात येते. ईएसपी यंत्रणेद्वारे बाहेर येणारा धूर हा पूर्णपणे स्वच्छ धूर आहे त्यामध्ये सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण फार कमी असते. |

५) **श्री. प्रफुल नानाजी येलचलवार, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्प प्रवर्तकांनी सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देताना स्थानिकांना प्राधान्य द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. च्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पामध्ये ९०-९५% स्थानिक कामगार आहेत. आपणांस आश्वासन देतो की प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये देखील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

६) **श्री. विठ्ठल ठाकरे, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकांनी सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देताना स्थानिकांना प्राधान्य द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. च्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पामध्ये ९०-९५% स्थानिक कामगार आहेत. आपणांस आश्वासन देतो की प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये देखील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

७) **श्री. सुनंदा विजय लिहीतकर, आमराई वार्ड, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे बहुतेक नागरीक बेरोजगार झालेले आहेत त्यामुळे सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यास स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध होतील. कंपनीला विनंती आहे की त्यांनी १००% प्रदूषण कमी करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. च्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पामध्ये ९०-९५% स्थानिक कामगार आहेत. आपणांस आश्वासन देतो की प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये देखील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

८) **श्री. मोहन येमुर्ले, शहर अध्यक्ष, बहुजन समाज पार्टी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. या कंपनीने जनसुनावणी आयोजित केली आहे. परंतु याबाबत कंपनीने घुग्घूस ग्रामपंचायत, नगरपरिषद व स्थानिक नागरीकांना माहिती न देता आयोजित केलेली आहे त्यामुळे आम्ही या जनसुनावणीला जाहीर विरोध दर्शवितो. मागील २५ वर्षापासून आम्ही प्रदूषणाच्या मुद्याशी लढत आहो. घुग्घूस परिसरात कितीही उपाययोजना केल्यानंतरही प्रदूषणाचा प्रभाव कमी होत नाही. जर कंपनी या क्षेत्रात अस्तित्वात आहे तर या | म.प्र.नि. मंडळाचे क्षेत्र अधिकारी यांनी सांगितले की, म.प्र.नि. मंडळाने नियमाप्रमाणे जनसुनावणीच्या ३० दिवसांच्या आधी दैनिक वृत्तपत्रांमध्ये जाहीरात प्रकाशित करून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) व प्रकाशित करण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी जाहिरातींची प्रत |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्रात बेरोजगारीचे प्रमाण जास्त का आहे? तसेच प्रदूषणाचे प्रमाण देखील कमी आहे तर येथील नागरीकांचा जीव धोक्यात का आहे येथील नागरीकांमध्ये आजाराचे प्रमाण देखील जास्त का आहे? | प्रकल्पालगतच्या ग्रामपंचायतींमध्ये नागरीकांना अभ्यासण्यासाठी ठेवण्यात आलेली होती. |

९) **सौ. अर्चना सुरेश पाझारे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या क्षेत्रात आधीच मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. या कंपनीचा प्रकल्प कार्यान्वित आहे व त्यामुळे येथे ट्रक पार्कींगची व प्रदूषणाची समस्या निर्माण झालेली आहे. या परिसरातील महिलांनी कंपनीला वारंवार निवेदन देऊनही याबाबत तोडगा काढण्यात आलेला नाही. तरी कंपनीला विनंती आहे की, ट्रक पार्कींगच्या समस्येचे निराकरण केल्यानंतरच प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या सदर नविन विस्तारीकरण प्रकल्पामध्ये प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. |

१०) **श्री. विक्की गुप्ता, स्थानिक पत्रकार, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे येथे स्थानिक नागरीकांना रोजगार, प्रदूषणाच्या प्रमाणात नियंत्रण व अद्यावत प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेले आहेत तर या क्षेत्रातील नागरीकांचा या विस्तारीकरण प्रकल्पाला विरोध का आहे? मागील कित्येक वर्षांपासून मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. हा उद्योग कार्यरत आहे परंतु सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे कोणत्याही बाबींची पूर्तता कंपनीने केल्याचे दिसून येत नाही. कंपनीने येथील कामगारांसाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था देखील पूरविलेली नाही. येथील स्थानिक नागरीकांनी कंपनीला भेट दिला असता कंपनी परिसरात गुडघा भर डस्ट साचलेली असल्याचे निदर्शनास आले. कंपनीमधील स्थानिक नागरीकांची मजबुरी असल्याने अशा असुरक्षित वातावरणात काम करावे लागत आहे. कंपनीने जुन्या प्रकल्पात प्रदूषणाच्या सर्व निकषांचे पालन करावे व तसेच कामगारांच्या सुरक्षेबाबत आवश्यक ती उपाय योजना करावी व त्यानंतरच नविन | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जुन्या प्रकल्पामध्ये असलेल्या प्रत्येक यंत्रणेकरिता वेगवेगळे एनर्जी मीटर बसविण्यात आलेले आहेत. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती वेळावेळी सादर करण्यात येते. त्यामुळे कोणतीही यंत्रणा बंद ठेवण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कंपनीतील सर्व प्रदूषण नियंत्रण यंत्रणा २४ तास कार्यान्वित असते. तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची वेळोवेळी रखरखाव व दुरूस्ती करून ती व्यवस्थितरीत्या चालविण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. कंपनी प्रदूषणाच्या तक्रारी डावलण्याकरिता दिवसभरात चिमणी कार्यान्वित करत नाही परंतु रात्री चिमणी कार्यान्वित करून येथील प्रदूषणात भर टाकत आहे. तसेच चिमनीकरिता विद्युत रोशनाईची व्यवस्था उपलब्ध केलेली नाही. रात्री घुग्घूस क्षेत्रात धुक्याची चादर पसरल्याप्रमाणे डस्टचे प्रमाण अनुभवायला मिळतात. माझी प्रदूषण नियंत्रण मंडळाला विनंती आहे की, त्यांनी लॉयड मेटल्स या उद्योगाची जुन्या प्रकल्पात असलेल्या त्रुटींची तपासणी करावी व त्यानंतरच सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास परवानगी द्यावी. | |

**११) श्री. रविश विनय सिंग, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | म.प्र.नि. मंडळाने दि. ०१/०९/२०२० रोजी मे. लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि. या उद्योगाची पाहणी केली व पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि. ०२/०९/२०२० रोजी उद्योगास Warning Notice दिली. त्यामध्ये बऱ्याच त्रुटी आढळून असल्याचे दिसून आले. त्यात ऑनलाईन डाटा म.प्र.नि. मंडळाच्या सर्व्हर ला थेट न जाता संगणकाच्या माध्यमातून जातो. जर म.प्र.नि. मंडळाला त्रुटी दिसल्या तर येथे सादरीकरणामध्ये सांगितलेल्या गोष्टी खऱ्या आहेत किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. कंपनीने गुपचुपरीत्या ही जनसुनावणी स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रकाशित न करता व स्थानिकांना माहिती न देता आयोजित केलेली आहे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**१२) श्री. रोहित बोरकर, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझे घर कंपनी परिसरालगत आहे. या कंपनीच्या प्रदूषणामुळे मी व माझ्या कुटुंबातील सदस्यांना श्वसनाच्या आजाराने ग्रासले आहे. मला देखील मागील ३ वर्षांपासून दम्याच्या आजाराचा त्रास सुरू झालेला आहे. कंपनीतील उडणारी डस्ट/धूळ नागरीकांच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी परिसरात पाणी फवारणी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. पाणी फवारणी क्षेत्र देखील वाढविण्यात आलेले आहे. तसेच मिस्ट टाईप |

| | | |
|---|---|---|
| | डोळ्यात जाते. कंपनीकडे वारंवार तक्रार करून देखील प्रदूषणावर नियंत्रण करण्यात येत नाही. साधी पाणी फवारणी देखील करण्यास कंपनी दुर्लक्ष करते. म.प्र.नि. मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या पाहणी आधी पाणी फवारणी केली जाते व पाहणीनंतर जैसे थे अवस्था असते. कंपनीच्या परिसरालगत पार्कीगची जागा आहे परंतु त्याठिकाणी देखील कोणत्याही प्रकारची व्यवस्था कंपनीने केलेली नाही. सदर जनसुनावणीला माझा विरोध आहे. कंपनी सर्वप्रथम लगतच्या परिसरातील समस्या दूर कराव्यात व त्यानंतरच नविन विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. नविन विस्तारीकरण प्रकल्पास मान्यता मिळाल्यास स्थानिक नागरीक आंदोलन करतील. | फॉगर्स देखील बसविण्यात आले आहेत ज्यामुळे धुळीचे उत्सर्जन होत नाही व पाण्याच्या टँकरद्वारे देखील पाणी फवारणी केल्या जाते. तसेच रस्त्यांवर सतत टँकरद्वारे पाणी फवारणी करण्यात येईल जेणेकरून डस्टचा प्रादुर्भाव कमी होण्यात मदत होईल. |

**१३) श्री. श्यामराव रामचंद्रराव बोबडे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने सादरीकरणात सांगितलेल्या बाबी ही व्यपचारीकता आहे. वास्तविक बाबी सादरीकरणात सांगितलेल्या गोष्टींपेक्षा विपरीत आहेत. वास्तविक बाबींचा अभ्यास कंपनीने केला किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. आम्ही मागील ५० वर्षापासून या क्षेत्रात प्रदूषणाचा त्रास सहन करत आहोत. माझी अधिकाऱ्यांना विनंती आहे की, त्यांनी येथील सामान्य नागरीकांना होणारा प्रदूषणाच्या त्रासाचा गांभीऱ्याने विचार करावा व त्यानंतरच नविन प्रस्तावित प्रकल्पास मान्यता द्यावी. जनसुनावणीदरम्यान केलेले सादरीकरण म्हणजे बनवाबनवी आहे. मागील तीन महिन्यात या क्षेत्रात व्यक्तिंचा मृत्यू हृदयविकाराने झालेला आहे त्याची चौकशी करण्यात यावी. शासनास विनंती आहे की त्यांनी तज्ञ लोकांची समिती स्थापन करून घुग्घूस परिसराचा आरोग्य विषयक सर्वेक्षण करून त्या अहवालाच्या अभ्यास करावा. येथे स्थानिक लाभार्थ्यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे कंपनीतील कंत्राटदारांनाच किंवा स्थानिक लोकप्रतिनिधींना नाही. माहिती अधिकाराअंतर्गत माहिती देण्यासही ग्रामपंचायतीने व कंपनी प्रशासनाने टाळाटाळ केली. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आमच्या येथे कर्मचारी उपलब्ध नाही असे उत्तर मला मिळाले. शासनाने जनसुनावणीची जाहीरात स्थानिक वृत्तपत्रात व संबंधित नगर परिषदेला अवगत करायला पाहिजे होते. परंतु असे काही झाले नाही त्यामुळे ही जनसुनावणी म्हणजे निव्वळ बनवा बनवी आहे. जो पर्यंत कंपनी प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या उपाय योजनेची हमी देत नाही तोपर्यंत आमचा या विस्तारीकरण प्रकल्पास विरोध आहे. | |

**१४) श्री. संजय विश्वनाथ टिपले, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या कंपनीची वसाहत म्हातारदेवी गावात अस्तित्वात आहे. परंतु म्हातारदेवी गावातील फक्त एका व्यक्तिस कंपनीमध्ये रोजगार प्राप्त झालेला आहे. कंपनीने CSR निधीअंतर्गत म्हातारदेवी गावात विकासाचे एकही कार्य केलेले नाही. तरी माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी CSR निधीअंतर्गत म्हातारदेवी गावात देखील विकासाचे काम करावे व प्रदूषणाबाबत योग्य नियोजन व उपाययोजना करावी, रोजगारात स्थानिकांना प्राधान्य द्यावे व त्यानंतरच नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.<br>अध्यक्ष, पर्यावरण जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रर्वतकांना सांगितले की त्यांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणेबाबत व शासनाच्या सन २००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे किमान ८०% स्थानिक नागरीकांना रोजगार विषयाबाबत विस्तृत स्वरूपात माहिती द्यावी. |

**१५) श्री. शेख सैमुद्दीन, पत्रकार, दै. विदर्भ चंडीका, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या परिसरात प्रदूषणाचे प्रमाण खूप आहे. वाढत्या प्रदूषणामुळे या क्षेत्रात दमा, टिबी, कॅन्सर सारख्या गंभीर आजाराचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. तसेच घुग्घूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये देखील डस्ट आढळून येते. वाहतूकीमुळे देखील धुळीचा प्रादुर्भाव जास्त दिसतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील |

| | | |
|---|---|---|
| | तसेच स्थानिकांना रोजगार देखील उपलब्ध नाही. स्थानिक नागरीकांच्या आरोग्याबाबत येथील प्राथमिक ओराग्य केंद्राकडून म.प्र.नि मंडळाने माहिती प्राप्त करून घ्यावी जेणेकरून सद्य:स्थिती अवगत होईल. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य मिळायलाच पाहिजे परंतु नागरीकांच्या आरोग्याबाबत देखील कंपनीने योग्य त्या उपाय योजना कराव्यात. | नागरीकांना रोजगारात प्राधा- देण्यात येईल. |

## १६) सौ. रंजना आनंद झाडे, माजी ग्रामपंचायत सदस्य, नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. या कंपनीने नकोडा ग्रामपंचायतीची परवानगी न घेता वर्धा नदीमधून पाणी उपसा केलेला आहे. कंपनीने नकोडा गावातील बेरोजगारांना नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पात रोजगाराच्या संधी उपलब्ध कराव्यात. तसेच सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या काळात महिलांना देखील रोजगाराच्या सधी उपलब्ध करून द्याव्यात किंवा महिलांकरिता योगशाळा किंवा व्यायामशाळेची सुविधा उपलब्ध करून द्यावी. कारखाना कार्यान्वित झाला की त्याचे फायदे व तोटे हे राहणारच आहे परंतु कंपनीने जास्तीत जास्त प्रमाणात स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा व गावाचा विकास करावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. पाणी चोरी प्रकरणाची चौकशी सिंचन विभाग करत आहे. मा. जिलहाधिकारी, चंद्रपूर यांच्या परवानगीनूसारच वर्धा नदीचे पाणी उपसण्यात आलेले होते. याबाबत नागरीकांना काही प्रश्न असल्यास त्यांनी महसूल विभागाशी संपर्क साधावा. महसूल विभाग आपणांस योग्य ते उत्तर देतील. तसेच कंपनीने त्यांचे उत्तर महसूल विभागाला सादर केलेले आहे. |

## १७) श्री. हेमराज बावने, युवा सेना तालुका प्रमुख, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. या उद्योगाचा विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित होणे ही गावाच्या हिताची बाब आहे. परंतु सदर कंपनीमुळे घुग्घूस गावातील नागरीकांना प्रदूषणाचा त्रास देखील होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व |

| | | |
|---|---|---|
| | याबाबत कंपनीला वारंवार निवेदन देऊन, तक्रार करून देखील कंपनी प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे आश्वासन व उपाययोजना केलेली नाही. घुग्घूस परिसरातील दवाखाना व जनता महाविद्यालय क्षेत्रात देखील डस्टचे प्रमाण खूप जास्त आहे. कंपनीने उद्योगातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे योग्य ते नियोजन देखील केलेले नाही. उद्योगातून निघणारे सांडपाणी विनाप्रक्रिया कंपनी आवाराबाहेर सोडण्यात येत आहे ज्यामुळे परिसरातील जनावरांचा मृत्यू होत आहे. कंपनी परिसरालगत असलेल्या झाडांवर देखील डस्टचा विपरीत परिणाम होत आहे. कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे, डस्ट नियंत्रण करण्याकरिता योग्य ती उपाययोजना करावी व त्यानंतरच नविन विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

**१८) श्री. अशफाक शेख, अध्यक्ष, कामगार संघटना, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कपंनीतील कामगारांचे मुद्दे कंपनीने सर्वप्रथम सोडवावे. कामगारांना सुरक्षेचे उपकरण जसे की, हेल्मेट, सेफटी शूज, ग्लोवज देण्यात येत नाही. ज्यामुळे कामगारांचा जीव धोक्यात येत आहे. कंत्राटी कामगारांच्या कराराचे नूतणीकरण मागील अडीच वर्षांपासून केलेले नाही. कामगारांसाठी दवाखान्याची सुविधा देखील उपलब्ध नाही. कामगारांचे वेतन देखील वेळेत नियमितपणे कंपनी प्रशासन करत नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्याची गंजलेली अवस्था आहे व यामुळे हॉपरची स्थिती धोकादायक आहे. त्यामुळे येथे काम करणाऱ्या कामगारांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. कंपनी प्रशासनाच्या वारंवार लक्षात आणून देऊनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी सर्वप्रथम कामगारांच्या समस्यांचे निराकरण करावे व त्यानंतरच विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१९) **श्री. विनोद सिद्दीकी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने कार्यरत असलेल्या ४० सुरक्षा रक्षकांना कामावरून काढून टाकले. कंपनीच्या या आदेशाविरूद्ध आंदोलन करण्यात आले होते. कंपनीने आश्वासन देऊन आंदोलन स्थगित करून घेतले परंतु आजपावेतो कंपनीने त्या ४० सुरक्षा रक्षकांना कामावर रूजू करवून घेतले नाही. सदर नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये या ४० बेरोजगार सुरक्षा रक्षकांना परत घ्यावे व त्यानंतरच विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२०) **श्री. विनोद जनजर्ला, सुशिक्षीत बेरोजगार, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्या व स्थानिक बेरोजगारांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत केलेली आहे व त्याची वेळोवेळी देखभाल देखील केली जाते. आपणास आश्वासित करतो की नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून योग्य त्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येतील व प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

२१) **श्री. मंगेश आसुटकर, उपसरपंच, ग्रामपंचायत ऊसगांव, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने मागील १५ वर्षांपासून ग्रामपंचायतीला कर भरणा केलेला नाही. कंपनीतील सांडपाणी नाल्यातून ओसंडून नाल्यालगतच्या शेतात जाऊन पिकांचे नूकसान होत आहे. तसेच जनावरे देखील हे प्रदूषित पाणी पितात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याबाबत लेखा शाखेमध्ये चौकशी करण्यात येईल व प्रलंबित असलेले कर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये |

| | | |
|---|---|---|
| | तसेच रोजगार देताना शैक्षणिक अर्हतेमध्ये त्रुटी काढून स्थानिकांना रोजगारातून डावलण्यात येते व बाहेरच्या व्यक्तिंना रोजगार देण्यात येते. कंपनीने मागील १५ वर्षांच्या कालावधीत कुठल्याही प्रकारचे CSR चे काम केलेले नाही. | भरण्यात येईल.<br>अध्यक्ष, पर्यावरण विषय जनसुनवणी समिती यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने कंपनीला नोटीस बजावावी व कंपनी प्रशासनाने सदर नोटीसचे उत्तर देऊन उर्वरित कराची रक्कम लवकरात लवकर ग्रामपंचायतीकडे सादर करावी. |

**२२) श्री. ईश्वर दिलीप बेले, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांबाबत कंपनीने लिखीत स्वरूपात आश्वासन द्यावे. त्यानंतरच नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास आम्ही समर्थन देऊ. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२३) श्री. अजय आमटे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनी कार्यान्वित झाल्यापासून येथे ४०० ते ५०० लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामुळे ७०० ते ८०० लोकांना रोजगार मिळणार आहे. कंपनीने १०० टक्के प्रदूषण नियंत्रण करावे व त्यानंतरच नविन विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित करावा. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२४) श्री. किरण बांदूरकर, सरपंच ग्रामपंचायत नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. या उद्योगाच्या जनसुनावणीबाबतचे पत्र माहे एप्रिल-२०२१ मध्ये ग्रामपंचायत नकोडा येथे प्राप्त झाले होते. परंतु कोराना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली. आज ही जनसुनावणी मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. च्या मुख्य द्वाराजवळ | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आयोजित करण्यात आली याचे मी स्वागत करतो. कंपनीने लगतच्या घुग्घूस, नकोडा, ऊसगांव, शेनगांव व पांढरकवडा गावातील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. या प्रकल्पात घुग्घूस आणि ऊसगांव या गावातील जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे. ऊसगांव येथील कास्तगारांना प्रदूषणाचा त्रास होत आहे. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी ऊसगांव येथील जमीन अधिग्रहीत करावी व स्थानिकांना रोजगाराच्या संधी द्यावी. | सद्य:स्थितीत प्रस्तावित विस्तारीकर प्रकल्प जुन्या प्रकल्पाच्या क्षेत्रातच कार्यान्वित करण्यात येणार आहे. भविष्यात जमीनीची गरज भासल्यास शासनाच्या धोरणानूसार जमीन अधिग्रहण करण्यात येईल व प्रकल्पग्रस्तांना योग्य तो मोबदला देऊन रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध करून देण्यात येतील. |

**२५) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद, तेलंगणा:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनी १० कि.मी. क्षेत्रातील आरोग्याचा अहवाल तयार करून त्याबाबत अभ्यास करावा. भूजलाचे सर्वेक्षण करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा. पावसाच्या पाण्याची साठवणूक करून त्याचा पुनर्वापर करावा. तसेच स्थानिक तरूणांसाठी कौशल्य विकास योजनेअंतर्गत कौशल्य विकासाचे शिबीरे आयोजित करून त्यांना रोजगाराकरिता प्रशिक्षण द्यावे. तसेच कंपनीने समन्वय समिती स्थापन करावी जेणेकरून स्थानिक नागरीक व कंपनीमध्ये सुसंवाद होऊन निर्माण होणाऱ्या समस्यांचे वेळोवेळी निराकरण करता येईल. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२६) श्री. राजीव रेड्डी, काँग्रस शहर अध्यक्ष, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे मी स्वागत करतो. परंतु कंपनीने मागील वर्षात झालेल्या अपघातांकडे आपण लक्ष दिले काय? पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन केले काय? प्रकल्पधारकाने नविन बॅग फिल्टर्स का बसविले नाहीत? तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करण्याकरिता कंपनी प्रशासनाने किती खर्च केला? कंपनीने कोराना काळात कोणत्याही प्रकारचे सामाजिक कार्य केले नाही. आम्ही आमच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेल्या प्रकल्पामध्ये असलेल्या त्रुट्या दुरूस्त करून त्यावर आवश्यक ती उपाय योजना करून प्रदूषण कमी करण्याचे सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील. तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये देखील योग्य ती अद्यावत प्रदूषण नियंत्रण |

| | | |
|---|---|---|
| | क्षमतेप्रमाणे सामाजिक कार्यासाठी खर्च केला. आपण सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे वास्तवात या सर्व बाबींची अंमलबजावणी खरोखरच होणार आहे किंवा कसे याबाबत शंका उपस्थित होते. नविन विस्तारीकरण प्रकल्पास विरोध नाही परंतु जुन्या युनिटमध्ये असलेल्या त्रुट्या दुरूस्त करायला पाहिजे होत्या पण तसे झाले नाही. त्यामुळे घुग्घूस क्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कंपनीने दररोज किमान ४ तास परिसरातील धूळ स्वच्छ करण्याची व्यवस्था करावी. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी जुन्या युनिटची सद्य:स्थितीचा आढावा घेऊन पुढच्या विस्तारीकरण प्रकल्पाचा विचार करावा. | यंत्रणा बसवून प्रदूषण कमी करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. तसेच पर्यावरण समिती जे सूचना देतील त्याप्रमाणे उपाययोजना करून एक आदर्श प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |

**२७) श्री. एच मधुबाबु, पर्यावरण कार्यकर्ता, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | नविन विस्तारीकरण प्रकल्पाचे मी स्वागत करतो. स्पॉन्ज आयर्नचे उत्पादन करताना कोळशाचा वापर करण्यात येतो. त्यामुळे प्रदूषण होते. परंतु कंपनीने जुन्या प्लांटमधील प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करून प्रदूषण नियंत्रण करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कंपनीने जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करावे जेणेकरून प्रदूषण नियंत्रणात आणता येईल. वेळोवेळी नियमितपणे पाणी फवारणी यंत्रणा कार्यान्वित करावी ज्यामुळे डस्टचे उत्सर्जन होणार नाही व प्रदूषण नियंत्रणात येईल. तसेच स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२८) श्री. मोहम्मद अली बेग, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत नकोडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., या कंपनीने मागील १५ वर्षांपासून नकोडा गावाला लागून असलेल्या वर्धा नदीचे पाणी बेकायदेशीररीत्या उपसले आहे. मागील ११ वर्षापासून मी मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर, मा. तहसलिदार व कंपनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रार केलेली आहे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | परंतु आजपावेतो सदर तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले नाही. ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र न घेता कंपनीने पाणी उपसा केलेला आहे. कंपनीने आजपर्यंत किती वृक्षारोपण केले? तसेच CSR अंतर्गत कुठलेही सामाजिक कार्य केलेले नाही. | |

**२९) श्री. रोशन परशुराम पचारे, अध्यक्ष, जिल्हा किसान काँग्रेस, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. लॉयड मेटल्स अँण्ड एनर्जी लि. या उद्योगाने त्यांच्या कार्यान्वित असलेल्या उद्योगामध्ये कार्यरत असलेले कंत्राटदारांची नावे सांगितलेली नाही. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामुळे घुग्घूस गावातील ७००-७५० नागरीकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. मे. लॉयड मेटल्स उद्योगाने शेजारी अस्तित्वात असलेल्या मे. ए.सी.सी.लि., या उद्योगाची पाहणी करावी. त्यांचे बांधकाम व त्यांनी वृक्षारोपणाची पाहणी करून त्याप्रमाणे कंपनी परिसरालगत असलेल्या क्षेत्रामध्ये वृक्षोरोपण करावे. कंपनीने ऊसगांव, पांढरकवडा, शेनगांव, नकोडा या गावातील नागरीकांना रोजगार द्यायलाच पाहिजे परंतु घुग्घूस शहरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास माझे समर्थन आहे परंतु या प्रकल्पाचा फायदा घुग्घूस शहरातील नागरीकांना झाला पाहिजे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**३०) श्री. विवेक बबनराव बोढे, शहर अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | ७०० लोकांना रोजगार मिळत असेल तर या प्रकल्पाला माझे समर्थन आहे कारण सदर विस्तारीकरण प्रकल्पामुळे बेरोजगारीची समस्या सुटण्यात मदत होईल. सदर प्रकल्पामध्ये स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात याबाबत आमची आग्रही भूमिका आहे. घुग्घूस शहर | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वासीयांसोबत होणाऱ्या चुकीच्या बाबींचा आम्ही तीव्र विरोध करणार. घुग्घूस शहराचे प्रदूषण कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाची साथ घेऊन कंपनीला वेठीस धरायला पाहिजे जेणेकरून कंपनी प्रशासन अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविणार आणि घुग्घूस शहराचे प्रदूषण कमी होईल. तसेच कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी एक आदर्श प्लांट उभारावा व घुग्घूस शहराचे प्रदूषण कमी करण्यास म.प्र.नि. मंडळाला सहकार्य करावे. | |

**३१) श्री. पवनकुमार आगदारी, माजी ग्रामपंचायत सदस्य व जिल्हाध्यक्ष, अनुसूचित काँग्रेस कमिटी, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे स्वागत आहे परंतु कंपनीने सर्वप्रथम वायु प्रदूषण, जल प्रदूषण, आरोग्याचे होणारे नूकसान व लगतच्या परिसरातील होणारे शेतीचे नूकसान टाळण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**३२) श्री. भूषण बोबडे, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या नागरीकांपैकी एकाही व्यक्तिने प्रकल्पामुळे होणाऱ्या शेतीच्या नूकसानीबाबत प्रश्न उपस्थित केलेला नाही. सदर प्रकल्पामुळे लगतच्या वस्तीचे व शेतपिकांचे नूकसान होत आहे व त्याकडे कंपनी प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. | सदर मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**३३) श्री. प्रशांत पुरी, उपाध्यक्ष (वाणिज्य) तथा मानव संसाधन विभाग, मे. लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि., घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये इंडक्शन फरनेस, रोलिंग मिल व सबमर्ज्ड आर्क फरनेसची उभारणी करून | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले |

| | | |
|---|---|---|
| | इनगॉट्स व बिलेट्स - ५,००,००० टन प्रतिवर्ष, टीएमटी व लाँग प्रॉडक्ट-५,००,००० टन प्रतिवर्ष व फेरो अलॉयज-२५००० टन प्रती वर्ष क्षमतेच्या संयंत्राच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. स्थानिक नागरीकांची मागणी आहे की प्रदूषण कमी करण्यात यावे व त्याकरिता अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ५.० लक्ष टन प्रति वर्ष टीएमटीचे उत्पादन करण्यात येणार आहे. सध्या कार्यान्वित असलेल्या प्रकल्पाची पाहणी करून सर्व पाणी फवारणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल व रस्त्यावर टँकरद्वारे सतत पाणी फवारले जाईल जेणेकरून डस्टचा प्रादुर्भाव कमी करणे शक्य होईल. तसेच रस्ता नेहमी भिजलेला असल्याची काळजी घेण्यात येईल. त्यामुळे वाहतूकीदरम्यान होणारे प्रदूषण टाळता येईल. सध्याच्या प्रकल्पामध्ये लोखंडी रॉड बनविण्याची प्रक्रिया केली जाते व तयार करण्यात आलेले लोखंडी रॉड ट्रकद्वारे दुसऱ्या ठिकाणी वाहतूक करून स्पॉन्ज आयर्न तयार करण्यात येते. प्रस्तावित प्रकल्पामुळे वाहतूकीची प्रक्रिया बंद करण्यात येईल. वितळलेल्या स्थितीतील बिलेट्स, टीएमटी बार तयार करण्याकरिता पु:तापन भट्टीमधून न पाठवता सरळ रोलिंग लाईनला पाठविण्यात येतात.थंड टीएमटी बारची त्यानंतर चाचणी केली जाते व वितरणाकरिता पाठविण्यात येते. यामुळे वाहतूकीदरम्यान होणारे प्रदूषण जसे की लोडींग व अनलोडींगमुळे होणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाण नगण्य होईल. तसेच भट्टीमध्ये हॉट टर्निंग प्रक्रियेनूसार तयार होणारे बिलेट्स रोलिंग मिलमध्ये टाकण्यात येतील. तसेच सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे ७००-७५० बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे. सदर रोजगाराच्या स्वरूपाबाबत सद्य:स्थितीत कोणतीही टिप्पणी करू शकत नाही. सदर जनसुनावणीचा शासनाच्या अंतिम निर्णयासोबत कोणत्याही प्रकारचा संबंध येत नाही. स्थानिक नागरीकांनी जनसुनावणी दरम्यान सादर केलेली निवेदने, आक्षेप, टिका-टिप्पणी शासनाकडे सादर केले जाईल. सदर निवेदन, आक्षेप, टिका-टिप्पणी शासनाकडे सादर केल्यानंतर शासन याबाबत जे निर्णय घेतील त्याची अंमलबजावणी कंपनीप्रशासनाला करणे बंधनकारक | की, स्थानिक ४-५ व्यक्तिंचे गंभ स्वरूपाचे प्रश्न येथे उपस्थित करण्यात आलेले आहेत. कंपनी प्रशासनाने या ४-५ लोकांची एक वेगळी बैठक आयोजित करून त्यांच्या समस्यांचे निराकरण करावे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विशयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी दरम्यान प्राप्त झालेले निवदेनाची प्रत तयार करण्यात येणाऱ्या ईतिवृत्तासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. तसेच शासनाने केलेल्या सुचनांचे पालन करून प्रस्तावित प्रकल्पामध्ये बदल करून प्रकल्प कायान्वित करण्यात येईल. तसेच शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे किमान ८०% स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल. सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेल्या प्रकल्पामध्ये ९०-९५% स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे याबाबत स्थानिक नागरीकांनी निश्चिंत राहावे. | |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्‌नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (उमाशंकर भादुले)<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (अ. मा. करे)<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (मनोहर गव्हाड)<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर |